# मिरा भाईंदर महानगरपालिका

**सामान्य प्रशासन विभाग**

मुख्यालय, पहिला मजला, स्व. इंदिरा गांधी भवन, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, भाईंदर (प.) दूरध्वनी क्र.022-28192828 ई-मेल आयडी gad@mbmc.gov.in


"माझे शहर, माझा अभिमान"

जा.क्र. मनपा/सा.प्र./३७७/२०२६-२७ दि.२४/०९/२०२६

## // आदेश //

**विषय : - दि. २९ सप्टेंबर २०२६ रोजी पंडित दीनदयाळ उपाध्याय " रोजगार महाकुंभ -महाराष्ट्र" अंतर्गत महानगरपालिका स्तरावर रोजगार मेळावे / Placement Drives आयोजित करण्याबाबत.**

**संदर्भ :- मा.ना.श्री. मंगलप्रभात लोढा, मंत्री, महाराष्ट्र राज्य यांचे जा.क्र. मंत्री. को. उद्या.रोज. नावि./टिप्पणी/०६८४/२०२६-२७, दि.०१/०९/२०२६ रोजीचे पत्र.**

उपरोक्त संदर्भिय विषयास अनुसरून कळविण्यात येते की, महाराष्ट्र शासनाच्या कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभागामार्फत **दि. २९ सप्टेंबर २०२६ रोजी राज्यभर १००० ठिकाणी पंडित दीनदयाळ उपाध्याय "रोजगार महाकुंभ-महाराष्ट्र"** हा व्यापक रोजगार उपक्रम आयोजित करणेकरिता निर्देशित केलेल आहे. या रोजगार महाकुंभचे उद्घाटन **मा.श्री. देवेंद्र फडणवीस जी, मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांचे हस्ते व मा.श्री. एकनाथ शिंदे जी, उपमुख्यमंत्री व मा.श्रीम. सुनेत्रा पवार जी, उपमुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य** यांचे उपस्थितीमध्ये होणार असल्याचे कळविले आहे. सदर उपक्रमाचा उद्देश जास्तीत जास्त रोजगार इच्छुक युवक-युवतींना त्यांच्या परिसरात रोजगाराच्या संधी उपलब्ध करुन देणे आणि उद्योग, आस्थापना व नियोक्तांना आवश्यक कुशल मनुष्यबळाशी जोडणे हा आहे.

त्या अनुषंगाने, मिरा-भाईंदर महानगरपालिका कार्यक्षेत्रामध्ये सदर रोजगार **मेळावा दि. २९ सप्टेंबर २०२६ रोजी सकाळी ०९:०० वा. धम्म सम्राट अशोक बुध्द विहार व विपश्यना केंद्र, रामदेव पार्क, मिरारोड पुर्व.** येथे आयोजित करण्यात आलेला आहे. तरी सदर रोजगार मेळावा यशस्वीरित्या आयोजित करण्यासाठी खालीलप्रमाणे अधिकारी/कर्मचारी यांची नेमणूक करण्यात येत आहे.

| अ.क्र | सोपविण्यात येणार कामकाज | जबाबदार अधिकारी / कर्मचारी | नियंत्रक अधिकारी |
|---|---|---|---|
| १. | ➢ स्टेज व्यवस्था, लाईट, वातानुकूलित यंत्रणा व ध्वनीक्षेपण यंत्रणेची (साऊंड सिटम) व संबंधित साहित्याची सर्व व्यवस्था वेळेत तयार करुन ठेवणे. तसेच इतर आवश्यक कामे करणे व सदर कार्यक्रमावर संपूर्ण नियंत्रण ठेवणे.<br>➢ स्टेजवर मान्यवरांसाठी पोडीयमची व्यवस्था करणे.<br>➢ सदर ठिकाणी मान्यवर व नागरिकांच्या बैठक व्यवस्थेकरिता १० VIP सोफे, २० टेबल, १५०० खुर्च्या | श्री. प्रशांत जानकर<br>शाखा अभियंता | श्री. दिपक खांबीत<br>प्र.शहर अभियंता |

| | | | |
|---|---|---|---|
| | व उपस्थित असणाऱ्या कंपन्याकरिता (१० X १० चे) ४ स्टॉलची व्यवस्था करण्यात यावी.<br>➢ सदर ठिकाणी गर्दी नियंत्रित करणेकरीता व नागरिकांच्या येण्या-जाण्याकरिता स्थळ पहाणी करुन बॅरिकेडची व्यवस्था करणे.<br>➢ कार्यक्रमाच्या ठिकाणी आवश्यक ते दिशादर्शक फलक, सुचना फलक लावण्यात यावे. | | |
| २. | ➢ रोजगार उपलब्ध करुन देणाऱ्या कंपनीसोबत समन्वय साधणे,<br>➢ संपुर्ण कार्यक्रमाची रुपरेषा तयार करणे.<br>➢ संपुर्ण कार्यक्रमाची महापालिकेच्या संकेतस्थळावर तसेच सोशल मिडिया साईटवर व्यापक प्रसिध्दी देणे.<br>➢ संपुर्ण कार्यक्रमाचे Documentation व चित्रफीत करणे.<br>➢ एम्लॉयमेंट पोर्टल तयार करुन त्यावर रोजगार इच्छुक उमेदवार नोंदणी करणे.<br>➢ करियर काउंसलिंग क्षेत्रात स्वयंसेवी संस्था (दे आसरा व लाइट हाऊस) ची मदत घेणे.<br>➢ इंडस्ट्री एसोसिएशन, सर्विस सेक्टर प्रमुख, रियल एस्टेट इत्यादी एम्लायर यांची बैठक घेणे. | १) श्री. राज घरत<br>जनसंपर्क अधिकारी<br>२) KPMG टिम | श्री. स्वप्निल सावंत<br>उपायुक्त<br>(अतिक्रमण) |
| ३. | ➢ आयोजित कार्यक्रमाचे परिपत्रक / निमंत्रणपत्रिका मा.पदाधिकारी, मा.नगरसेवक/नगरसेविका यांना देणे. | श्री. कैलास म्हात्रे<br>लिपीक | श्री. दिनेश कानगुडे<br>सचिव |
| ४. | ➢ संपुर्ण कार्यक्रमाकरिता खान-पान व्यवस्था करणे. | श्री. भारत सोलंकी<br>लिपीक | श्री. सुनिल यादव<br>सहा.आयुक्त (सा.प्र) |
| ५. | ➢ सदर कार्यक्रमठिकाणी साफ-सफाई राहिल याची दक्षता घेणे. | श्री. अरविंद चाळके<br>उप मुख्य स्वच्छता अधिकारी | श्री. योगेश गुणिजन<br>सहा.आयुक्त<br>घनकचरा व्यवस्थापन |
| ६. | ➢ सदर कार्यक्रमाचे कामकाज करणेकरिता आवश्यकतेनुसार लिपिक, संगणक चालक व शिपाई यांची नेमणूक करण्यात यावी.<br>➢ सदर ठिकाणी गर्दी नियंत्रित करणेकरिता सुरक्षा रक्षकांची नेमणूक करणे.<br>➢ मनपा स्तरावरील कंत्राटी / ठोक मानधनावरील कर्मचारी यांना नियुक्ती पत्र देणे. | श्रीम. अन्सेलमा चिंचक<br>कार्यालयीन अधीक्षक | श्री. सुनिल यादव<br>सहा.आयुक्त (आस्था) |
| ७. | ➢ शिक्षण क्षेत्रात काम करणाऱ्या स्वयंसेवी संस्थांचा सहभाग सुनिश्चित करणे.<br>➢ संपुर्ण कार्यक्रमाचे सुत्रसंचालन करणे. | श्री. साहेबराव अहिरे<br>मुख्याध्यापक | श्रीम. सुलभा वटारे<br>शिक्षणाधिकारी |
| ८ | ➢ सदर ठिकाणी आवश्यक उपाययोजना करणेकामी आपल्या अधिनस्त अधिकारी / कर्मचारी सोबत उपस्थित रहावे. | श्री. अल्पेश संखे<br>अग्निशमन केंद्र अधिकारी | श्री. प्रकाश बोराडे<br>मुख्य अग्निशमन अधिकारी |
| ९ | ➢ सदर ठिकाणी आवश्यक उपाययोजना करणेकामी रुग्णसेवक व वैद्यकीय पथकासह उपस्थित रहावे. | श्री. नंदकिशोर लहाने<br>मुख्य वैद्यकीय अधिकारी | श्रीम. कविता बोरकर<br>उपायुक्त<br>(सार्वजनिक आरोग्य) |

वरील प्रमाणे नमुद अधिकाऱ्यांनी सोपविलेले कामकाजांची जबाबदारी पार पाडावी. तसेच सदर कामात हलगर्जीपणा होणार नाही याची दक्षता घ्यावी.

(डॉ. सचिन बांगर)
उप-आयुक्त (मु.)
मिरा भाईंदर महानगरपालिका

(मा. आयुक्त महोदय, यांच्या मान्यतेने)

प्रत माहितीस्तव :
१) मा. आयुक्त महोदय, मि.भा.मनपा
२) मा. अति.आयुक्त (१ व २) मि.भा.मनपा
३) उपायुक्त (सर्व) मि.भा.मनपा